सायं.दैनिक
बीड किसान
www.beedkisan.in
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

बीड • वर्ष ५ • अंक ३०६ • सोमवार, दि. १६ मार्च, २०२६ • पोस्टल दिनांक १७ मार्च, २०२६ • RNI : MAHMAR/2021/80738 • Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 • पाने ४ • किंमत २ रु.

BEED • Year-5 • Issue-306 • Monday 16 March, 2026 • Postal Date 17 March, 2026 • RNI : MAHMAR/2021/80738 • Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 • Pages 4 • Price 2

पोलीस भरती लेखी परीक्षेची तात्पुरती उत्तरतालिका प्रसिद्ध

बीड (किसान न्युज): जिल्हा पोलीस भरतीची लेखी परीक्षा काल रविवारी (दि.१५) सकाळी आदित्य कॉलेजमध्ये पार पडली आहे. या परिक्षेची तात्पुरती उत्तरतालिका प्रसिद्ध करण्यात आली. त्यासाठी एक क्युआर कोड ही प्रसिद्ध करण्यात आला. याबाबत काही आक्षेप असतील तर ती नोंदविण्यासाठी आजची वेळ देण्यात आली आहे. जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदासाठी १५ मार्च २०२६ रोजी पार पडलेल्या लेखी परीक्षेची तात्पुरती उत्तरतालिका पोलीस प्रशासनाकडून अधिकृतपणे प्रसिद्ध करण्यात आली आहे. सकाळी ११.०० ते दुपारी १२.३० या वेळेत ही परीक्षा आयोजित करण्यात आली होती. परीक्षेतील संच ए, बी, सी आणि डी या चारही संचांच्या उत्तरतालिका आता उमेदवारांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या प्रसिद्ध केलेल्या उत्तरतालिकेवर उमेदवारांना काही आक्षेप किंवा तक्रार असल्यास त्यांनी योग्य पुराव्यासह आज सोमवार दि. १६ मार्च २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत आपले म्हणणे मांडणे आवश्यक आहे. उमेदवारांनी आपले आक्षेप केवळ sp.beedmahapolice.gov.in या अधिकृत ईमेल पत्त्यावरच पाठवावेत असे आवाहन करण्यात आले आहे. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही आक्षेपाचा विचार केला जाणार नाही, असे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

परीक्षेच्या वेळेसच शिक्षकांना बीएलओ चे काम लाऊन गरिबांच्या लेकरांच वाटोळं करायचं का?

गोरगरिबांच्या लेकरांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात शासन व प्रशासन या गंभीर बाबीकडे लक्ष देणार का?

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असेलतर एसआयआर साठी वेगळी व्यवस्था करावी

बीड । किसान न्युज

राज्यात सध्या एसआयआर मोहीम सुरू असून, ही मोहीम ऐन परीक्षेच्या तोंडावर सुरू झाली असल्याने जिल्ह्यातील शेकडो जिल्हापरिषद शिक्षक बीएलओ म्हणून या निवडणूक आयोगाच्या कामात व्यस्त असून, विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडून हे शिक्षक मतदार याद्या दुरुस्त करीत फिरत आहेत. यामुळे जिल्हापरिषद शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. या गंभीर बाबीकडे शासन आणि प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने पालकांमधून संताप व्यक्त करीत या निवडणूक आयोगाच्या कामासाठी वेगळी व्यवस्था करावी आणि शिक्षकांना शाळेवर नियमित पाठविण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे.

यामुळे आमदार, मंत्री अन् अधिकाऱ्यांची मुले जिल्हापरिषद शाळेत हवीत

जिल्हापरिषद या सरकारी शाळांची अवस्था कशी आहे याची चर्चा नेहमीच असते, यावर तोडगा म्हणून जिल्हापरिषद शाळांमध्ये मंत्री, आमदार, आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांच्या मुलांचे प्रवेश बंधनकारक करण्याची मागणी होते पण निर्णय घेणार हेच असल्याने तसा निर्णय होत नाही. पण परीक्षांचा काळ तोंडावर असताना ही मतदार याद्यांच्या कामाला प्राधान्य देऊन चक्क शिक्षकांची बीएलओ म्हणून पूर्णवेळ नियुक्ती केली. यामुळे गोरगरिबांच्या लेकारांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे. तसेच जर मंत्री, आमदारांची मुले जिल्हापरिषद शाळेत शिक्षण घेत असतील तर असा निर्णय घेतला असता का? यामुळे जिल्हापरिषद शाळेत मंत्री, आमदार आणि संधी अधिकाऱ्यांची मुले हवीच अशी प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

एसआयआर ही मतदारयादी आणि नावे दुरुस्तीचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. या कामासाठी नेहमीप्रमाणे शासन आणि प्रशासनाने जिल्हापरिषद शिक्षकांच्या खांद्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. पण यावेळी शासन आणि प्रशासनाने शाळेच्या वार्षिक परीक्षेकडे दुर्लक्ष करीत निवडणूक विभागाच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील अनेक गावांतील शेकडो शिक्षकांना काही दिवसांसाठी पूर्णवेळ बीएलओचे काम सोपविण्यात आले आहे. या कालावधीत मतदार नोंदणी, » पान २ वर

पलटी होताच ट्रॅव्हल्सने घेतला पेट; २८ प्रवासी जखमी

केज-मांजरसुंबा रस्त्यावरील घटना; सुदैवाने जिवीतहानी टळली

केज । किसान न्युज

धोकादायक वळणावर पलटी झालेल्या ट्रॅव्हल्सने पेट घेतल्याची गंभीर घटना मधरात्री २:३० वाजण्याच्या सुमारास केज-मांजरसुंबा रस्त्यावर सांगवी-सारगी जवळ घडली आहे. या अपघातात तब्बल २८ प्रवासी जखमी झाले आहेत. मात्र ग्रामस्थांनी मदत केल्याने प्रवाशांना वाहनातून तातडीने बाहेर काढण्यात आल्याने जिवीतहानी टळली आहे. यातील जखमी किरकोळ जखमी असल्याने त्यांच्यावर उपचार करुन रात्रीच सुट्टी देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. जळगाव येथून लातूरकडे जात असलेली भरधाव वेगातील खाजगी ट्रॅव्हल्स सोमवार (दि. १६) मध्यरात्री २:३० वाजण्याच्या सुमारास केज मांजरसुंबा रोडवर असलेल्या सांगवी-सारणीच्या वळणावर » पान २ वर

एचपीएम कंपनीच्या चुकीमुळे प्रवाशांच्या जिवीताला धोका

अहमदपूर-नगर असा हा राष्ट्रीय महामार्ग असून, या महामार्गाचे काम एचपीएम कंपनीने केलेले आहे. हा रस्ता पाहता याच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण होतो आहे. ज्या वळणावर हा अपघात झाला तो खूप मोठे वळण आहे. या धोकादायक वळणावर रस्त्याला भेगा पडलेल्या असून, रस्ताही दबून त्यास जंपींग निर्माण झाला आहे. यामुळे या वळणावर रात्रीच्या वेळी भरधाव वेगातील वाहने हेलकावे खात असून यामुळे चालकांचे वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात घडत आहेत. रात्रीचा ही अपघात असाच असून या रस्त्याचे काम करणाऱ्या कंपनीच्या चुकीमुळे प्रवाशांच्या जिवीताला धोका निर्माण झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

कपिलधार येथे शिवसंग्रामची जिल्हा कार्यकारणी बैठक

बीड । किसान न्युज

शिवसंग्राम पक्षाची जिल्हा कार्यकारणी बैठक आज बीड तालुक्यातील कपिलधार येथे शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. आगामी ग्रामपंचायत तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका आणि संघटनात्मक बांधणी या पार्श्वभूमीवर ही बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, मराठवाडा अध्यक्ष अनिल घुमरे, ज्येष्ठ नेते सुभाष जाधव, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कोकाटे, शहराध्यक्ष सुहास पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी संघटनेची प्रगती ही कार्यकर्त्यांच्या सक्रियतेवर अवलंबून असल्याचे सांगितले. कार्यकर्त्यांनी गावोगाव तसेच वाडी-वस्त्यांपर्यंत संघटनेचे जाळे अधिक मजबूत करावे आणि स्वर्गीय मेटे साहेबांच्या विचारांचा वसा व वारसा समर्थपणे पुढे न्यायावा, असे त्यांनी आवाहन केले. » पान २ वर

गॅस पाठोपाठ आता महाराष्ट्रावर वीज संकट

महावितरण कडून ऐन उन्हाळ्यात तातडीचे भारनियमन सुरू

बीड । किसान न्युज

सध्या देशावर गॅस आणि इंधनाचे संकट घोंगावत असताना आता शुक्रवार पासून आणीबाणीचे भारनियमन सुरु करण्यात आले आहे. यामुळे आता महाराष्ट्रावर विजेचे संकट आले असून, उन्हाळा सुरू होताच महावितरण कंपनीने भारनियमन सुरू केल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे. एकवेळ होती राज्यात ८ ते १२ तासांचे भारनियमन होते. मात्र हे चित्र बदलून भारनियमन बंद झाले आहे. पण मागील काही वर्षांपासून उन्हाळा सुरू » पान २ वर

जेव्हा तापमान ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचेल, तेव्हा कंपनी मागणी कशी पूर्ण करेल?

महाराष्ट्रातील जनतेसाठी ही एक चिंतेची बाब आहे, कारण मार्च महिन्यात जेव्हा राज्यातील बहुतांश ठिकाणी तापमान अजून ४० अंश सेल्सिअसच्या वर गेलेले नाही. जर महावितरणला विजेची मागणी पूर्ण करणे शक्य होत नसेल, तर राज्यातील मोठ्या भागात जेव्हा तापमान ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचेल, तेव्हा ही मागणी कंपनी कशी पूर्ण करेल? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

बीड एलसीबीने स्विफ्ट कारसह गुटखा पकडला

६.६८ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

बीड । किसान न्युज

जिल्ह्यातील अवैध व्यवसायांवर आळा घालण्यासाठी बीड पोलिसांकडून सातत्याने कारवाई सुरू असून स्थानिक गुन्हे शाखेने बीड शहरात मोठी कारवाई करत गुटखा तस्करीचा प्रकार उघडकीस आणला आहे. फुलाईनगर परिसरात स्विफ्ट कारमधून विविध कंपन्यांचा गुटखा विक्रीसाठी आणला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली. पोलीस नवनीत कावंत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या पथकाने १६ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास ही कारवाई केली. बीड शहर हद्दीतील एमएच-४३/एस-५७२५ क्रमांकाच्या स्विफ्ट कारमध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला विविध कंपन्यांचा गुटखा मोठ्या प्रमाणावर आढळून आला. पोलिसांनी कारसह एकूण ६ लाख ६८ हजार १८४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरील प्रकरणी भाऊसाहेब राम पडुळे वय ३४ राहणार औरंगपूर हल्ली मुक्काम सुवर्णनगरी फुलई नगर बीड यास मुद्देमाला सह ताब्यात घेण्यात आले सदरील त्याने » पान २ वर

परळी मध्ये भीषण आग; बंगला खाक

मोठे आर्थिक नुकसान मात्र सुदैवाने जिवीतहानी टळली

परळी । किसान न्युज

शहरात रात्री भीषण आगीची घटना घडली असून, या आगीत बंगला जळून पूर्णपणे खाक झाला असल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे मात्र सुदैवाने यामध्ये जिवीतहानी टळली आहे. सकाळपर्यंत ही आग नेमकी लागली कशी याचा उलगडा झाला नाही. याची चौकशी सुरू असून त्यानंतरच नेमकं नुकसान किती आणि आगीचे कारण समोर येईल. शहरातील विद्यानगर भागात रविवारी (दि.१५) रात्री नऊ वाजेच्या सुमारास गीत्ते पेट्रोल पंपाशेजारी असलेले अरुण टाक यांचे निवासस्थानाला भीषण आग लागली. या आगीमुळे बंगला जळून खाक झाला आहे. आगीने रौद्र रूप धारण केल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. घटनेची माहिती मिळताच परळी आणि अंबाजोगाई येथील अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी » पान २ वर

शिवछत्र परिवाराच्या रोजा इफ्तार पार्टीला मोठा प्रतिसाद

अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित यांनी दिल्या मुस्लिम बांधवांना शुभेच्छा



गेवराई । किसान न्युज

मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने रविवार, दिनांक १५ मार्च रोजी 'शिवछत्र' परिवाराच्या वतीने 'दावत-ए-इफ्तार' कार्यक्रमाचे गेवराईत अतिशय उत्साहात आयोजन करण्यात आले होते. शिवछत्र परिवाराकडून आयोजित केलेल्या सामाजिक ऐक्य आणि सलोख्याच्या इफ्तार सोहळ्याला मोठी उपस्थिती लावून हिंदू-मुस्लिम समाजाने मोठा प्रतिसाद दिला. यावेळी राष्ट्र वादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित यांच्यासह शिवछत्र परिवारातील सदस्यांनी याप्रसंगी उपस्थित राहून सर्व मुस्लिम » पान २ वर

शिवछत्र परिवाराकडून सामाजिक ऐक्य आणि सलोख्याचा 'इफ्तार' सोहळा

स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट
157,000
२२ कॅरेट
151,000
चांदी प्रतिकिलो
265,000

तीन महिने उलटूनही चौकशी अहवाल प्रलंबित; जिल्हा परिषद प्रशासनावर प्रश्नचिन्ह

बीड । किसान न्युज

जिल्हा परिषद बीडच्या वित्त विभागाकडून पंचायत समिती शिरूर (कासार) येथील कनिष्ठ लेखाधिकारी यांच्या कामकाजाबाबत कारणे दाखवा नोटीस देऊन चौकशी समिती नेमण्यात आली होती. मात्र या प्रकरणाला तब्बल तीन महिने उलटूनही चौकशीचा अंतिम अहवाल अद्याप सादर करण्यात आलेला नसल्याने जिल्हा परिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जिल्हा परिषद बीडच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार २२ जानेवारी २०२६ रोजी चौकशी समितीची नियुक्ती करण्यात आली होती. या समितीमध्ये वित्त विभागातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करून संबंधित प्रकरणाची सात दिवसांत सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. या प्रकरणात विविध आर्थिक व्यवहार, नोंदी व कार्यपद्धती संदर्भात अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. त्यानुसार चौकशी समिती स्थापन करून अल्पावधीत अहवाल देण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र आदेशानुसार सात दिवसांत अहवाल सादर होणे अपेक्षित असताना तीन महिने उलटूनही चौकशी अहवाल सादर झालेला नसल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे चौकशी प्रक्रियेबाबत प्रशासनाची उदासीनता दिसून येत असल्याची चर्चा होत आहे. या प्रकरणातील सत्य परिस्थिती समोर » पान २ वर

विजेचा लपंडाव अंबाजोगाईचा पाणीपुरवठा विस्कळीत

सारूळ १३२ केव्ही विद्युत केंद्र कार्यान्वित करण्यासाठी आ. नमिता मुंदडा प्रयत्नशील

अंबाजोगाई । किसान न्युज

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धनेगाव येथील मांजरा प्रकल्पातील पंप हाऊसला होणारा वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने अंबाजोगाई नगर परिषदेचे पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक कोलमडले आहे. वीज पुरवठ्यातील या सततच्या व्यत्ययामुळे जलवाहिन्यांचे पंप वारंवार बंद पडत आहेत, परिणामी शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. धनेगाव सबस्टेशनला कळंब येथून १३२ केव्ही लाईनवरून वीज पुरवठा होतो. सध्या उन्हाळ्यामुळे विजेची मागणी प्रचंड वाढली आहे. त्यामुळे अतिरिक्त लोड पडत असल्याने हे केंद्र वारंवार ट्रिप होत असून, त्याचा थेट परिणाम पाणी उपसा करणाऱ्या पंपांवर होत आहे. तसेच, धनेगाव येथील इन्सुलेटर आणि तारांवर अतिरिक्त ताण येत असल्याने त्या तुटण्याचे प्रमाणही वाढले आहे. या तांत्रिक अडचणींमुळे नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी मोठ्या प्रयत्नाने सहा दिवसांवर आणलेला अंबाजोगाई शहरातील पाणीपुरवठ्याचा कालावधी आता ८ ते १० दिवसांवर गेला आहे. त्यासोबतच के जसह परिसरातील अनेक गावांचा विद्युत पुरवठाही वर्णावर खंडित होत आहे. या समस्येवर कायमस्वरूपी » पान २ वर